# बेस्ट कन्व्हीक्शन ऑफ दि मंथ माहे मार्च – २०१८

## वडाळा पोलीस ठाणे, मुंबई.

| | | |
|---|---|---|
| १ | **गु.र.क्र व कलम** | वडाळा पोलीस ठाणे गुरक्र.१४९/२०१५ कलम ३७६(क) भादवि. सह कलम ६, १० पोक्सो कायदा २०१२ |
| २ | **गुन्हा घडला दिनांक** | माहे मे २०१३ ते दिनांक ३०/०६/२०१५ रोजी १६.१५ वा. चे दरम्यान |
| ३ | **गुन्हयाचे ठिकाण** | रूम नं. १३७, अॅन्टॉप हिल झोपडपट्टी, सायन कोळी वाडा, अॅन्टॉप हिल, मुंबई व गणेश नगर झोपडपट्टी, एस.पी.रोड, वडाळा पुर्व मुंबई ३७. |
| ४ | **फिर्यादी** | १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी |
| ५ | **बळीत/~~मयत~~** | एक १७ वर्षीय व एक १५ वर्षीय असे दोन अल्पवयीन मुली |
| ६ | **आरोपी अटक** | राजाराम कानु टकले वय ३७ वर्षे,<br>**अटक दिनांक ०२/०७/२०१५ रोजी ११.५५ वा.** |

वडाळा पोलीस ठाणे गुरक्र.१४९/२०१५ कलम ३७६(क) भादवि. सह कलम ६, १० पोक्सो कायदा २०१२ या गुन्हयात माहे मे २०१३ ते दिनांक ३०/०६/२०१५ रोजी १६.१५ वा. चे दरम्यान रूम नं. १३७, अॅन्टॉप हिल झोपडपट्टी, सायन कोळी वाडा, अॅन्टॉप हिल, मुंबई व गणेश नगर झोपडपट्टी, एस.पी.रोड, वडाळा पुर्व मुंबई ३७. याठिकाणी यातील आरोपीत वडील नामे राजाराम कानु टकले वय ३७ वर्षे याने त्याची १७ वर्षीय अल्पवयीन मुलीला माहे मे २०१३ पासुन दमदाटी व मारहाण करून वारंवार जबरी लैंगिक अत्याचार केला तसेच त्याचीच दुसरी १५ वर्षीय अल्पवयीन मुलीला देखिल मागील दीड वर्षापासुन दमदाटी व मारहाण करून वारंवार जबरी लैंगिक अत्याचार केला व सदरबाबत कोणास सांगीतल्यास मारहाण करण्याची धमकी दिली म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून दिनांक ०२/०७/२०१५ रोजी सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला.

वडाळा पोलीस ठाणेच्या पथकाने मानवी कौशल्य वापरून दिनांक ०२/०७/२०१५ रोजी ११.५५ वा. आरोपी नामे राजाराम कानु टकले वय ३७ वर्षे यास नमुद गुन्हयात अटक केली. सदर पथकाने बळीत दोन्ही मुलींची वैद्यकिय तपासणी केली. तसेच बळीत मुली व आरोपी यांचे वैद्यकिय तपासणीवेळी घेतलेले रक्तगट, तपासणी नमुने, इतर नमुने व स्वॅब इ. रासायनिक विश्लेषणाकरीता पाठविले. सदर गुन्हयाचा सखोल तपास करून नमुद आरोपीतांविरूध्द सबळ पुरावा प्राप्त करून दिनांक २९/०९/२०१५ रोजी मा. विशेष पोक्सो न्यायालय, मुंबई येथे पोक्सो केस क्र. ४८५/२०१५ अन्वये सदर गुन्हयाचे दोषारोप पत्र दाखल केले.

सदर पथकाने मा. विशेष पोक्सो न्यायालय, मुंबई येथे गुन्हयातील आरोपीने जामीनाकरीता अर्ज केला असता, योग्य मुद्दे नमुद करून जामीन मिळण्यास सक्त हरकत घेतली. त्यामुळे आरोपीस जामीन नामंजुर झाला नाही. तसेच सरकारी पक्षातर्फे समर्थपणे बाजु मांडुन सदर गुन्हयातील फिर्यादी, पंच, साक्षीदार यांना सुनावणीचे वेळी हजर ठेवून तसेच सबळ परिस्थीतीजन्य पुरावा तसेच वैदयकीय अहवाल, रासायनिक प्रयोगशाळेचे अहवाल आणि २७ पुरक साक्षीदार/पंच सादर करून दिनांक २२/०२/२०१८ रोजी मा. विशेष पोक्सो न्यायालय, मुंबई न्यायालयाने आरोपी राजाराम कानु टकले वय ३७ वर्षे यास दोन्ही अल्पवयीन मुलींवर अत्याचाराबाबत

**१) १७ वर्षीय बळीत मोठी मुलगी ( यातील फिर्यादी ) हिचे गुन्हयाबाबत ––**

अ) भादवि कलम ३७६(२) प्रमाणे **आजन्म कारावास** व रु.२०,०००/–द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०६ महिने सश्रम कैद, इ) पोक्सो कलम ६ प्रमाणे **आजन्म कारावास** व रु.२०,०००/–द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०६ महिने

सश्रम कैद,क) भादवि.कलम ५०६ प्रमाणे **०४ वर्षे सश्रम कारावास** व रु.५,०००/—द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०२ महिने सश्रम कैद,

**२) तसेच १५ वर्षीय बळीत लहान मुलगी हिचे गुन्हयाबाबत ––**

अ) भादवि कलम ३७६(२) प्रमाणे **आजन्म कारावास** व रु.२०,०००/—द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०६ महिने सश्रम कैद, इ) पोक्सो कलम ६ प्रमाणे **आजन्म कारावास** व रु.२०,०००/— द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०६ महिने सश्रम कैद, क) भादवि.कलम ५०६ प्रमाणे **०४ वर्षे सश्रम कारावास** व रु.५,०००/—द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०२ महिने सश्रम कैद,

वरिल सर्व शिक्षा दोषसिध्द आरोपीने एकत्र भोगायच्या आहेत. त्याचप्रमाणे शिक्षेत नमुद केलेल्या दंडाच्या सर्व रकमा अपील कालावधी संपल्यानंतर बळीत मुलींना देण्याबाबत मा. न्यायालयाने आदेशित केले आहे.

माहे मे २०१३ पासुन १७ वर्षीय मुलीस दमदाटी व मारहाण करून वारंवार जबरी लैंगिक अत्याचार करणारा तसेच दीड वर्षापासुन १५ वर्षीय लहान मुलीस दमदाटी व मारहाण करून वारंवार जबरी लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीस वडाळा पोलीस ठाणेच्या पथकाने अटक करून त्याचेविरूध्द दोषारोप पत्र दाखल केले व मा. विशेष पोक्सो न्यायालय, मुंबई येथे सरकारी पक्षातर्फे समर्थपणे बाजु मांडुन सबळ पुरावे व साक्षीदार सादर केल्याने आरोपीस शिक्षा झाली आहे.

सदर संवेदनशील गुन्हा दोषसिध्द झाल्याने मा. पोलीस आयुक्तांनी त्यांना माहे मार्च – २०१८ चे **बेस्ट कन्व्हेक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे दोषसिध्दी** पारितोषिकाने सन्मानित केलेले आहे.

**वडाळा पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील अधिकारी/अंमलदार**

| अ.क्र. | अधिकारी व अंमलदाराचे नाव |
|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक फुलदास यादव भोये |
| २ | पोलीस उप निरीक्षक विठठल लक्ष्मण खरात |
| ३ | पोनाक्र.३३०८९/महेश वसंत नाईक |
| ४ | मपोनाक्र.६४२/छाया शांताराम गायकवाड |
| ५ | मपोनाक्र.९८०४१४/तनुश्री तुषार बावधने |

—— ००० ——